शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.३४/२०२३

श्री. सोगटे संजय हरीराम
मु.पो.तांदुळवाडी, ता.वाळवा
जि. सांगली ४१५४११ } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव,
ता.खटाव, जि. सातारा ४१५५०२
२. रयत शिक्षण संस्था, सातारा
पोवई नाका, सातारा } वि.ए.

रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव, ता.खटाव, जि.सातारा येथील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.संजय हरीराम सोगटे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.३०/१०/२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी रयत शिक्षण संस्थेत दि.२३/११/२००६ पासून कार्यरत झालो. मी पंढरपूर, सातारा, कोल्हापूर या ठिकाणी सेवा केली आहे. परंतू माझी आई २०२१ पासून आजारी आहे. आईचे वय ७४ इतके आहे. मी अपंग आहे. माझ्या आईची सेवा करण्यासाठी मला माझ्या गावापासून डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली) ता.पलूस, जि.सांगली हे सोईचे आहे. त्या कॉलेजवर गेली दोनच वर्ष मी बदलीने आलो आहे. माझा मुलगा शिक्षण आणि सांगली येथे स्थाईक आहे. माझी सेवा तीनच वर्ष राहिलेली आहे. त्यामुळे मला पुसेगाव हे माझ्या गावापासून १६५ कि.मी. इतके अंतर आहे. माझ्या आईची सेवा करणे शक्य नाही व रोज जाणे येणे शक्य नाही. तरी मला माझ्या सोईने मला रामानंदनगर ता.पलूस, जि.सांगली येथेच मिळावी. त्यामुळे मला माझ्या आईकडे व मुलाकडे लक्ष ठेवता येईल. मी एकटाच मुलगा असल्याने मलाच सेवा करावी लागते. आई संधिवात व इतर आजाराने फारच ग्रस्त आहे. तरी माझी माझ्या गावापासून जवळचे कॉलेज म्हणजे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथे माझी बदली करावी ही विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री.सोगटे संजय हरिराम यांची बदली डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथून कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव येथे रयत शिक्षण संस्था, सातारा यांचेकडील ऑर्डर नंबर

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

एचईडीएन/१५२५२ दि.१७/१०/२०२३ नुसार झालेली आहे. श्री.सोगटे हे या महाविद्यालयात दि.१७/१०/२०२३ रोजी दुपारी ५ वाजता या महाविद्यालयात हजर झालेले आहेत. त्यांनी त्या दिवशीची दि.(१८/१०/२०२३) मस्टरला सही केली आहे. तथापि प्राचार्यांची पुर्वपरवानगी न घेता वैद्यकिय रजेचा अर्ज देवून निघून गेलेले आहेत. त्या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मिटींगसाठी गेलेले होते.

श्री.सोगटे यांना या महाविद्यालयात हजर राहणेबाबत मोबाईलव्द्वारे संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की माझी गैरसोईने बदली झाली आहे. मी या महाविद्यालयात हजर राहू शकत नाही. श्री. सोगटे यांच्याशी आम्ही वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे ते अद्याप महाविद्यालयात हजर झालेले नाहीत. या संदर्भात रयत शिक्षण संस्था, सातारा यांचेकडे आमचेकडील पत्र कं.४१६/२०२३-२४ दि. ०६/११/२०२३ व आमचेकडील पत्र कं.४३७/२०२३ दि.२३/११/२०२३ नुसार या महाविद्यालयात हजर राहणेबाबतचा पत्रव्यवहार केलेला आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

श्री.संजय हरिराम सोगटे यांची डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर येथून दि. १७/१०/२०२३ रोजी प्रशासकीय कारणास्तव कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव येथे बदली करण्यात आलेली आहे.

श्री.सोगटे संजय हरिराम हे बदली आदेशानुसार दि.१८/१०/२०२३ रोजी सायं.०५.०० वाजता कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव येथे हजर झाले आहेत. त्यानंतर प्राचार्यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता, वैद्यकिय रजेचा अर्ज महाविद्यालयाकडे सादर करून ते आजअखेर महाविद्यालयात गैरहजर आहेत. महाविद्यालयाने त्यांना वारंवार पत्रव्यवहार करून हजर होण्यास कळविले आहे. मात्र ते अद्याप हजर झालेले नाहीत.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुत तक्रारदार यांनी संस्थेने केलेल्या दि.१७.१०.२०२३ च्या बदली आदेशाविरुध्द् तक्रार दाखल केलेली आहे. सदर बदली आदेशान्वये रयत शिक्षण संस्थेने तक्रादार यांची डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली) या महाविद्यालयातील वरिष्ठ लिपीक या पदावरुन प्रशासकीय कारणास्तव कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव, जि.सातारा येथे त्याच पदावर दि.१८.१०.२०२३ या तारखेपासून बदली केली आहे व नवीन पदावर त्वरित रुजू होण्याचे आदेश दिले आहेत. तक्रारदाराच्या कथनानुसार तो स्वतः अपंग आहे. त्याची आई ७४ वर्षाची असून ती सन २०२१ पासून आजारी

आहे. त्यांच्या आईची सेवा करण्याकरिता त्यांच्या जवळ दुसरे कोणीही नाही. त्यांना डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली हे सोईचे ठिकाण होते. या महाविद्यालयात ते गेल्या दोन वर्षापासून बदलीने हजर झालेले आहेत. त्यांची सेवा तीन वर्ष एवढीच राहिलेली आहे. त्यांच्या बदलीचे ठिकाण हे त्यांच्या गावापासून १६५ किलोमीटर एवढया अंतरावर असल्यामुळे त्यांना त्याच्या आईची सेवा करणे शक्य नाही. तसेच रोज येणे जाणे करणे देखील शक्य नाही. त्याचा मुलगा हा शिक्षणासाठी सांगली येथे स्थायिक असून त्याची पत्नी सोलापूर जिल्हयात कामानिमित्त राहत आहे. सबब, त्याची झालेली बदली ही अत्यंत गैरसोइची असून त्याची पूर्ववत डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली येथे पूर्वपदावर बदली करण्यात यावी. या मागणी करिता तक्रारदार यांनी प्रस्तुत तक्रार दाखल केलेली आहे.

सदर प्रस्तुतची तक्रार ही महाविद्यालय मार्फत या समितीला प्राप्त झालेली असून महाविद्यालयाने आपला तक्रारीबाबतचा अभिप्राय तक्रार अर्जासोबत समितीकडे पाठविलेला आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या दि.३०/११/२०२३ रोजीच्या लेखी अभिप्रायामध्ये तक्रारदार याची बदली डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि.सांगली येथून कला, वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव सातारा येथे यांचे आदेश क्रं. H.Edn./१५२५२ दि.१७.१०.२०२३ ने झालेली असून तक्रारदार या महाविद्यालयातून दि.१८.१०.२०२३ रोजी दुपारी ०५.०० वाजता हजर झाले असून त्यांनी हजेरीपत्रकावर स्वाक्षरी केलेली आहे. तथापि प्राचार्यांची पूर्व परवानगी न घेता वैद्यकीय रजेचा अर्ज दिलेला असून निघून गेलेले आहेत. त्या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे बैठकीसाठी गेलेले होते. तक्रारदारांस मोबाईलव्द्वारे संपर्क करुन हजर राहण्यास कळविलेले असून त्यांनी त्यांची बदली गैरसोईने झालेली असून ते या महाविद्यालयात हजर राहू शकत नाहीत असे सांगितले. त्यांचेशी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन हजर राहण्यास सांगितलेले असून देखील ते अद्यापि महाविद्यालयात हजर झालेले नाहीत असे या समितीस कळविण्यात आलेले आहे. या अभिप्रायासोबत महाविद्यालयाने तक्ररदारास वेळोवेळी लेखी सूचना देऊन हजर होण्याबाबत कळविण्यात आले असून बदलीचा पत्रव्यवहार या समिती पुढे दाखल करण्यात आलेला आहे. त्यावर तक्ररदाराच्या स्वीकृतीच्या स्वाक्ष-या आहेत.

सुनावणीच्या वेळी आयत्या दिवशी वेळोवेळी सूचना देऊनही संस्थेतर्फे कोणीही हजर झालेले नाहीत. मागील तारखेस स्पष्ट सूचना देऊन देखील आज संस्थेतर्फे मुदत मागणीचा अर्ज दाखल केलेला असून त्यात संस्थेच्या पूर्वनियोजित महत्वाच्या कार्यक्रमामुळे उपस्थित राहू शकत नाही. त्यामुळे सुनावणीची पुढील तारीख मिळावी असा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. तक्रारदाराची बदली ही संस्थेच्या आदेशान्वये झालेली असून तक्रारदाराची बदली कोणत्या कारणास्तव करण्यात आली या बाबतचे

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

स्पष्टीकरण केवळ संस्थाच देऊ शकते. त्यामुळे संस्था आणि तिचा अभिप्राय हा महत्वाचा भाग या प्रकरणात असू शकतो. तथापि सुरुवातीपासून संस्था या प्रकरणात गैरहजर राहत असून कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण या समितीसमोर देत नाही. तक्रारदारांनी आपल्या कथनाचे पुष्टयार्थ तो स्वतः ६५ टक्के अपंग असल्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र, जे सिव्हिल सर्जन, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील हॉस्पिटल, सांगली यांचे मेडिकल बोर्डाने जारी केलेले आहे ते दाखल केलेले आहे. त्यासोबत महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागचा दिनांक १५.०४.२००४ चे परिपत्रक क्रमांक अपंग-१००४/प्र.क्रं. १८/०४/१६-अ, दि.१५.०४.२००४ चे हजर केलेले आहे. त्यांचे अवलोकन करिता असे स्पष्ट दिसून येत आहे की, महाराष्ट्र शासनाने अशा स्पष्ट सूचना जारी केलेल्या आहेत की, शासकीय कर्मचा-याचे बदल्यांचे विनियमन करण्याकरिता दिनांक १६.०१.२००४ रोजी प्रसिध्द् केलेल्या आदेशाच्या अधीन राहून शासकीय सेवेतील अपंग कर्मचा-यांच्या बदल्या प्रशासकीय सोयीनुसार शक्य असल्यास त्याच्या राहत्या ठिकाणाजवळ करण्यात याव्यात. या परिपत्रकातील सूचना रयत शिक्षण संस्थेशी तंतोतंत लागू पडू शकत नाहीत. तथापि या सूचनांचा मार्गदर्शक सूचना म्हणून विचार करता येऊ शकतो. ज्या ठिकाणी तक्रारदार हा अपंग आहे, त्याचे अपंगत्व हे ६५ टक्के इतके आहे त्या ठिकाणी या मार्गदर्शक सूचनांचा विचार संस्थेने निश्चितपणे करावयास पाहिजे होता असे या समितीचे मत आहे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे तक्रारदारांची सेवेचे केवळ काहीच वर्षे शिल्लक राहिलेले आहेत असे तक्रारदारांचे कथन आहे. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे त्यांची सेवा तीन वर्ष शिल्लक राहिली आहे. तक्रारदारांनी त्यांच्या आईच्या आजारी असण्याची काही कागदपत्रे आज या समितीसमोर सादर केलेली असून, काही छायाचित्रे दाखविली आहेत आणि त्याच्या कथनानुसार त्याच्या आईची देखभाल करण्याकरिता कोणीही नाही. त्याची पत्नी जिल्हा सोलापूर या ठिकाणी कामानिमित्त आहे आणि त्याचा मुलगा शिक्षणासाठी सांगली येथे आहे. त्याचे बदलीचे ठिकाण हे त्याच्या आत्ताच्या राहण्याच्या ठिकाणापासून १६५ किलोमीटर अंतरावरती आहे. यावरुन ही बाब स्पष्ट होते की, त्यांना त्यांच्या आईची देखभाल करण्याकरिता त्याच्या बदलीचे ठिकाण हे गैरसाईचे आहे. हे जरुर आहे की, बदली ही नोकरीचा एक अविभाज्य भाग असतो आणि कर्मचा-याला झालेली बदली ही मान्य करावीच लागते. तथापि ज्या वेळेला बदली होत असते त्यावेळेला त्याची सोय आणि गैरसोईचा विचार करणे देखील क्रमप्राप्त होते. अडीअडचणी, सोई, गैरसोई यांचा विचार न करता केलेल्या बदल्या, या जरी अवैध नसल्या तरी, त्या अडी-अडचणी, सोई, गैरसोई, कर्मचा-यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम करत असतात आणि परिणामतः उभय पक्षांचेच नुकसान होत असते. या तत्वांचे पालन शासकीय परिपत्रक व मागदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्या गेलेले आहे आणि त्याचा भंग संस्थेने केलेला दिसून येतो. [illegible] वर नमूद केल्याप्रमाणे संस्थेने सुनावणीस हजर राहण्याबाबत [illegible] कोणतेही स्पष्टीकरण याबाबत केलेले आढळत नाही. तक्रारदाराने

या समितीसमोर संस्थेविरुध्द् आरोप केले होते. त्यापैकी एक आरोप असा आहे की, त्याच्या जागी संस्थेला प्रिय असणारा एक कर्मचारी १८ वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असून ती व्यक्ती बदलीकरिता पात्र असून देखील त्याला न बदलता तक्रारदाराला बदलले आहे. या आरोपाच्या पुष्टयार्थ तक्रारदाराने कोणतेही कागदपत्रे समितीसमोर सादर केलेले नाहीत. तसेच संस्थेनेही समितीसमोर हजर होवून आपले म्हणणे मांडलेले नाही. या प्रकरणी संस्था समितीसमोर हजर झालेली नाही. तसेच संस्था जाणूनबुजून या समिती समोर हजर झालेली नाही असे समितीच्या निदर्शनास येते. महाविद्यालय जरी समितीसमोर हजर झाले असले तरी तक्रारदाराच्या बदली बद्दल महाविद्यालय कोणतेही स्पष्ट कारणे देऊ शकत नाही. सबब, तक्रारदारांची बदली ही सुयोग्य कारणा करिता झाली असल्याचे या समितीच्या निदर्शनास येत नाही. तक्रारदार यांनी जी काही कागदपत्रे समितीसमोर सादर केलेली आहेत त्यावरून तक्रारदारांची बदली ही अत्यंत गैरसोईची आहे या तक्रारदाराच्या तक्रारीत तथ्य आढळून येते. सबब, तक्रारदाराची तक्रार मंजूर करावी लागेल असे या समितीचे मत आहे. करिता समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

१. तक्रारदाराचा बदली आदेश क्रं.H.Edn./१५२५२ दि.१७.१०.२०२३ हा खारिज करण्यात येत आहे.

२. तक्रारदारास त्याचे पूर्वीचे महाविद्यालय डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली या ठिकाणी रुजू करुन घेण्यात यावे असा आदेश संस्थेस आणि महाविद्यालयास करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 15/02/2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.